# Washim District Police

**Nature of Work** :- **Solving Sensatoinal Crime**

**Police Station** :- **WashimPolice**

**Date of Good Work done** :- **14/09/2020**

**Brief of the work done :-**

वाशीम - बहु चर्चित वैष्णवी जाधव लापता मामले का पर्दाफाश, रिश्तेदार हि निकले हत्यारे, पती-पत्नी को किया गिरफ्तार. पुलिस अधीक्षक वसंत परदेशी इन्होनी दि जाणकारी, दि. १४/०९/२०२०

**Greed, deceit and lies: How a greedy kinswoman turned out to murderer**

Nearly 9 months later, the search for Vaishanavi Jadhav ended. A new one – this time, for the person responsible for her death – began "I'm here today to share with you that we've brought Vaishnavi home." Sadly, she was not recovered as we and her family had hoped and prayed these last nine months.

For the last nine months, we've not been able to say definitively what this was beyond it was a missing child, Certainly, the prayers and hopes of the family is that we would someday find her alive and bring her home. Didn't work

Vaishnavi Jadhav 15 years, student of Grade 9 Happy Faces School, disappeared from her home on 19 January 2020.

A missing complaint was filed on 20 January 2020... A comprehensive search in all aspects was carried out Pune, Hyderabad, Shirdi, Bihar, Uttar Pradesh… all possibile grounds were grilled deep but unfortunately our search for Vaishanavi ended and new hunt for her murderer begun...

The people who came in our surveillance radar were Vaishnavi's relatives, teacher only... on deep probing & analysis we came out with results that Vaishanvi's Murderers were none other than her first cousin sister n her husband…

During interrogation this couple gave the game away as how they abducted Vaishanavi with the administration of sedative drink to her and strangled to death and burnt Vaishanvi's body near Mahada Fata. Vaishanvi's belongings and corpse remains bones were recovered from the crime spot…

Hunt ended in a unfortunate close on a tragic note. That's okay; you can't cater to all tastes. Instead of holding back pray for Vaishanvi's soul be in peace and her parents get enough patience to live with this bitter truth of her lost…

I m grateful to my team my Addl SP, Dy SP, PIs all the officers n person who helped in cracking this missing mystery turned out to murder hunt... All should take lesson n before trusting anyone think twice Stay safe, protected, alert...

Jai Hind… Jai Maharashtra…

Vasant Pardeshi (IPS)
Superintendent of Police,
Washim.

पुण्यनगरी

# तब्बल आठ महिन्यांनी झाला 'वैष्णवी'च्या हत्येचा उलगडा

## नातलगांनीच केला घात : आरोपी पती - पत्नीस अटक

**वाशीम**, दि. १४ (प्रतिनिधी)

वारंवार अपमानजनक वागणूक देने आणि पैशांची मागणी पूर्ण न केल्याच्या क्षुल्लक कारणावरुन नातलगांनीच १५ वर्षीय वैष्णवी जाधव हीची अतिशय क्रुरपणे हत्या केल्याचा प्रकार उघड झाला आहे. जानेवारी महिन्यात वैष्णवी बेपत्ता झाली होती, तब्बल आठ महिन्यांनी या अपहरण आणि खून प्रकरणाचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले आहे. वैष्णवीचे जवळचे नातलग असलेल्या पती-पत्नीला पोलिसांनी अटक केली आहे. माधुरी गोटे व बद्रीनारायण गोटे अशी आरोपींची नावे आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक वसंत परदेशी यांनी १४ सप्टेंबर रोजी पत्रकार परिषदेत या संपूर्ण प्रकरणाची माहिती दिली

यावेळी जिपाअे परदेशी यांनी सांगितले की, शहरातील लाखाळा परिसरातील माधव नगरमध्ये विजय जाधव व त्यांचे कुटूंब सासू-सासऱ्यासह राहत होते. तर आरोपी माधुरी गोटे ही नातेवाईक असल्याने ती देखील बरेच दिवस जाधव कुटुंबाकडेच राहत होती, त्यामुळे माधुरीला जाधव कुटुंबियांची इत्यंभूत माहिती होती. विजय जाधव यांना किडनीचा त्रास असल्यामुळे ते उपचारासाठी पत्नीसह गुजरात मध्ये गेले.



त्यांची मुलगी वैष्णवी ही हॅपी फेसेस स्कूलमध्ये इयत्ता नववीत शिकत होती. १९ जानेवारी रोजी सायंकाळी तीचे कामा संतोष जाधव घरी आले असता त्यांना वैष्णवी घरी दिसली नाही. यावेळी त्यांनी भावाचे सासरे शालीग्राम खडसे यांना वैष्णवी बाबत विचारपूस केली असता ती, मैत्रीणीच्या वाढदिवसाला गेल्याचे त्यांनी सांगीतले. मात्र, रात्री उशीरापर्यंत वैष्णवी घरी न आल्याने तीचा इतरत्र शोध घेतला परंतु ती कुठेच आढळून आली नाही, शिवाय तीचा मोबाइल देखील बंद येत होता. त्यामुळे संतोष जाधव यांनी २० जानेवारी रोजी पोलिसांत फिर्याद दिली.

सदर घटनेचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. पवन बनसोड यांच्याकडे दिल्यानंतर तपासाला गती यावी यासाठी पोलिसांची तीन पथके तयार करण्यात आली. या तीन पथकांनी औरंगाबाद, पुणे, शिर्डी, अहमदनगर तसेच हैदराबाद, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश आदी ठिकाणी जाऊन वैष्णवीचा शोध घेतला मात्र तीचा शोध लागला नाही. हे प्रकरण अधिकच किचकट होत असल्याने पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे मालेगाव तालुक्यातील अमानी येथील माधुरी गोटे हीच्यावर लक्ष केंद्रीत केले आणि तीची वारंवार चौकशी केली असता अखेर तीने गुन्ह्याची कबुली दिली. तीने तीचा पती बद्रीनारायण गोटे याच्या मदतीने १९ जानेवारी रोजी फियारला नेते असे सांगून वैष्णवीचे अपहरण केले. कोल्ड्रींकमध्ये गुंगीचे औषध टाकून तीला एका वाहनातून शिरपूर मार्गे अकोला रोडने वांगी ते रिधोरा मार्गावरील हनुमान मंदिराजवळ आणले आणि या ठिकाणी तीचा गळा दाबून तीची क्रूरपणे हत्या केली. वैष्णवीची शारिरीक दृष्ट्या कमकुवत असल्याने ती अधिक काळ प्रतिकार करु शकली नाही, त्यामुळे तीला जीव गमवावा लागला. त्यानंतर या दोघांनी तीचा मृतदेह जाळून टाकला. एवढ्यावरच न थांबता पुरावा नष्ट करण्याच्या दृष्टीने दुसऱ्या दिवशी वैष्णवीचे उरलेले प्रेत जमिनीत पुरुन टाकले शिवाय तीचा फोन, बॅग, चष्मा व इतर साहित्य एका विहिरीत फेकून दिले. दोघांनीही सदर घटनेची कबुली दिल्यानंतर पोलिसांनी १३ सप्टेंबर रोजीच घटनास्थळावरुन वैष्णवीच्या हाडांचे अवशेष ताब्यात घेतले तर १४ सप्टेंबर रोजी विहिरीतून साहित्य शोधण्यासाठी या ४० फूट विहिरीतील पाणी काढण्याचे काम सुरु केले. या प्रकरणात आणखी कुणाकुणाचा सहभाग आहे, हे शोधण्यासाठी पोलीस कसून चौकशी करीत असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक परदेशी यांनी यावेळी दिली.

सदर पत्रकार परिषदेला अतिरीक्त पोलीस अधीक्षक विजयकुमार चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी तथा तपास अधिकारी डॉ. पवन बनसोड, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी ठाकरे उपस्थित होते. यानंतर रात्री उशीरा जिपोअ परदेशी यांनी घटनास्थळाची पाहणी केली.